# निसर्ग प्रेरित पॅकेजिंग डिझाइन



**निरीक्षण :** निसर्गामध्ये आपल्याला मिळणाऱ्या गोष्टी, उदाहरणार्थ: फळं आणि भाज्या कश्या पद्धतीने पॅक केलेले आहेत हे पहा. या सर्वांचे आकार, रंग, स्पर्श (कडक/मऊ/काटेरी/खरबरीत/गुळगुळीत), आणि अंतर्गत रचना खूप वेगवेगळी आहे. आणि काही वेळा हे आपल्याला अंतर्गत भागाची स्थिती दर्शवतात (कच्चे किंवा पिकलेले). काही फळं/ भाज्या घ्या आणि त्यांच्या नैसर्गिक आवरणाचा अभ्यास करा आणि त्यांचे फायदे व तोटे यावर चर्चा करा.

**डिझाइन :** कोणतेही फळ/भाजी निवडा जे तुम्हाला पॅकेजिंगच्या पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी प्रेरित करते आणि तुम्हाला आवडणाऱ्या खाण्यायोग्य किंवा कोणत्याही दुसऱ्या पदार्थांसाठी नवीन पॅकेजिंग डिझाइन तयार करा (उदाहरणार्थ: चॉकलेट, रस, बिस्किट, टिश्यू पेपर, इत्यादी). तुमचे डिझाइन यापूर्वी अभ्यास केलेल्या नैसर्गिक वस्तुच्या पॅकेजिंग तंत्राला अनुसरून असले पाहिजे.

वरील चित्रात दाखवलेल्या वस्तू फक्त नमुन्याखातर आहेत.
प्रतिमा स्त्रोत: https://pixabay.com/ आणि https://www.publicdomainpictures.net/en/ (सार्वजनिक डोमेन)

# निसर्ग प्रेरित पॅकेजिंग डिझाइन

**पार्श्वभूमी**

पॅकेजिंगचा उद्देश काय आहे? आपण कधी विचार केला आहे का, की निसर्ग त्याच्या निर्मितीची पॅकेजिंग कसे करते? जसे डाळिंबाच्या वा मटारच्या बियां, कांद्याचे थर किंवा सोलायला सोपी असलेली केळी किंवा अंड्याचे कवच जे आतील द्रव्याला सुरक्षित ठेवते? निसर्गाने कठीण, मऊ, नाजूक, स्तरित, तुकडे अश्या विविध गोष्टींसाठी विविध प्रकारचे वैशिट्यपूर्ण आवरण तयार केले आहे, ज्यामुळे आतील भागातील गोष्टी सुरक्षित आणि ताजी राहतात.

बायोमिमेटिक्स म्हणजे मनुष्याच्या रोजच्या साध्या किंवा गुंतागुंतीच्या समस्यांचे निराकरण करण्याच्या हेतूने नैसर्गिक मॉडेल्स, प्रक्रिया किंवा सिस्टमची केली जाणारी नक्कल. बायोमिमेटिक्स संशोधनाचे एक वाढते क्षेत्र आहे जे विज्ञान आणि डिझाइनला जोडते (Soba et al., 2016). पॅकेजिंग डिझाइनच्या जगातही निसर्ग प्रभावशाली ठरू शकतो. बऱ्याचदा लोकांनी वस्तूंना सुंदर बनवण्यासाठी, व त्यांच्या सहज व सुरक्षित वाहतुकीसाठी निसर्गाकडून कल्पना घेतल्या आहेत. निसर्ग प्रेरित पॅकेजिंग डिझाइन करताना डिझाइनरला निसर्गाचे अनुकरण करण्याची व नैसर्गिक गुणधर्मांचा वापर करून प्रभावी आणि आकर्षक डिझाइन करण्याची संधी मिळते.

## References:


Soba, A. I., Zaki, B., Aliyu, A. M., & Tanimu, M. (2016). A study of biomimetic architectural traits in a pre-medical school complex in Nigeria: A casestudy of faculty of medicine, Kaduna state university (kasu) complex, Kaduna. *Journal of Environment and Earth Science 6*(5), 132141.

Benyus, J. M. (1997). *Biomimicry: Innovation inspired by nature*. NY: Harper Collins Publishers Inc

Tank, K., Moore, T., & Strnat, M. (2015). Engineering encounters: Nature as inspiration. *Science and Children, 53*(2), 72-78. Retrieved April 15, 2020, from www.jstor.org/stable/43691982

**Websites**

https://biomimicry.org/four-engaging-ways-bring-biomimicry-classroom/

https://www.makinginspiredbynature.org/

Packaging and Labeling: Wikipedia ( Retrieved April 15, 2020)
https://en.wikipedia.org/wiki/Packaging_and_labeling